म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. क्र. १६२४
REFBK-0011765
REFBK-0011765

काळे.
३८८१४.
१५.८.६४
रु. २।
१६२४.

# रू
# प
# गं
# धा

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत.
अनुक्रम [illegible] वि: काव्य
क्रमांक [illegible] नोंः दि: [illegible]

सुरेश
श्रीधर
भट

REFBK-0011765
REFBK-0011765
मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
११७६५

नाग-विदर्भ
प्रकाशन
अमरावती

मूल्य रुपये चार केवळ

© नागविदर्भ प्रकाशन
अमरावती

प्रथम आवृत्ति
१५ मार्च १९६१

मुद्रक
बा. ग. ढवळे
कर्नाटक मुद्रणालय
चिराबाजार, मुंबई २

प्रकाशक
पुं. ना. देशमुख
नागविदर्भ प्रकाशन
अमरावती

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम ३६६९४ वि: का९५
क्रमांक १६२४ नों दि: २५।५।६७

— रामदासभाई श्रॉफ यांस

# अनुक्रम


रूपगंधा १
मधुतान २
आतां मात्र... ३
राधा ४
मुठींत माझ्या बंद तुफान ! ५
छेड छेड तेंच गीत ! ७
मी कसा वेडा ! ८
एकान्त ! ९
नभ झुरतें १०
गीत तुझें १२
मिठी १३
माहेरवाशीण १४
कुशींतलें फूल १५
नेहमीच १६
जुईच्या रे फुला ! १७
आता कोठें— १९
कांटा २१
पुन्हा वीज चमकली ! २२
हें माझें अग्निगीत ! २३
झुरणी २४
किनारा २६
मोहर २७
मधुराणी २८
भाऊबीज २९
दुःख माझें ३०
जुन्याच जखमा ३१
पायांना श्रेय मिळे ३२
—आणि तरीहि ३३
दुःखांनो ३४
ही जुनीच पाउलवाट ३६
ज्वलन्त मी तर एक निखारा ३८
हद्दपार ४०
वेगळा मी ४२
तुटलेल्या पंखांस— ४४
माझें स्मित हरपलें ! ४५
निर्धार ४७
रंगेल कलंदर ४९
घृणा ५०
आपुल्या कैफांत मी ! ५१
कां मैफलींत गाऊं ? ५२
सरलें वादळ ५३
व्रत ५५
एक छटेल गौळण ! ५६
शंका ५७
नाहीतर— ५९
चेहरे ६०
तडजोड ६१
मायबोली ६२

अजुनीही... ६४
पहाट ६५
संक्रांत ६६
माझ्या खुळ्या आसवांनो— ६७
गाशी माझेंच गीत ६८
तीन रूबाया ७०
ऊन्ह ७१
गाऱ्हाणें ७२
एवढें ७३
खोपा ७४
पण ७५
जाग ७६
अंधाराच्या बुरुजावरही ... ७७
काजवे ७८
कधीच ! ७९
नसणें ८०
पत्र ८१
ऐकलीस ! ८२
मागणें ८३
फुला ८४
ऊब ८४
दिसलें ... ८५
संध्याकाळ ८६
स्मरण ८८

# रूपगंधा

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. ११८६५
शाखा

# रूपगंधा

मल्मली तारुण्य माझें तूं पहाटे पांघरावें !
मोकळ्या केसांत माझ्या तूं जिवाला गुंतवावे !

लागुनी थंडी गुलाबी शिर्शिरी यावी अशी, कीं
राजसा, माझ्यांत तूं अन् मी तुझ्यामाजी भिनावें !

गर्द राईतून यावा भारलेला गार वारा...
तूं मुक्या ओठांत माझ्या दंशताजें ऊन्ह प्यावें !

चांदण्याचा श्वास जाईच्या फुलांमाजी विरावा...
आपुल्या डोळ्यांत साऱ्या तारकांनी विर्घळावें !

तापल्या माझ्या तनूची तार झंकारून जावी
रेशमी संगीत स्पर्शाचें पुन्हा तूं पेटवावें !

रे ! तुला बाहूंत माझ्या रूपगंधा जाग यावी...
मीं तुला जागें करावें ! तूं मला बिल्गून जावें !

## मधुतान

गे कविते ! सखये, तुझा लागला छंद
विसरलो जगा मी करपाशीं तव धुंद !

जाहलो तिरस्कृत गळां लागली तात
पर्वा न मला, मी आपुल्याच झोकांत !

मी हसतो माझ्या ओघळत्या अश्रूंत
आसवें मिसळती अर्धस्फुट हास्यांत

हें हृदय करितसे मधापून आकान्त
राहती शब्द पण ओठांतिल ओठांत !

जन म्हणती, " वाया पार बावळा पोर !
पाही न रात बेरात, वेगळा नूर ! "

हिंडतो सारखा जणू नसे घरदार
मी इकडे तुझिया स्वप्नांतच गे चूर !

निष्पाप शिशूची कोमलता नवजात
सौंदर्य उजळतो इकडे हा प्राजक्त

मज दिसती वेडीं हृदयें मोहरलेलीं
ही तुझीच दुनिया, दौलत माझी सगळी !

पूर्णिमा बहरते रोज तुझ्या गगनांत
नाहून टाकते मज अमृतधारांत

मग हृदय नाचतें होउनिया बेभान
अन् सहजच निघते कंठांतुन मधुतान !

## आतां मात्र....

हळूहळू येत आहे
माझ्या व्यथेला आकार,
हळूहळू होत आहे
मान झुकलेली वर.

जशी जशी तीव्र होई
माझ्या काळजाची कळ,
तसेंतसें उचंबळे
माझें झुंजायाचें बळ.

आजपावेतों साहली
व्यर्थ स्वप्नांची लाचारी,
चार पिसांना मानिलें
कोट नभींची भरारी !

आता मात्र होत आहे
माझी माझ्याशीं ओळख,
फुटताहेत गीतांना
माझ्या यातनांचे पंख !

## राधा

कृष्ण दीप ! राधा ज्योति !
कृष्ण शिंप ! राधा मोती !
कृष्ण तीर ! राधा धारा !
कृष्ण व्योम ! राधा वारा !

कृष्ण फूल ! राधा गंध !
कृष्ण चाल ! राधा छंद !
कृष्ण वृक्ष ! राधा पान !
कृष्ण गान ! राधा तान !

कृष्ण नेत्र ! राधा आसूं !
कृष्ण ओठ ! राधा हासूं !
कृष्ण अर्थ ! राधा बोल !
कृष्ण चाल ! राधा तोल !

कृष्ण रात ! राधा नीज !
कृष्ण राग ! राधा चीज !
कृष्ण रूप ! राधा डोळे !
कृष्ण मधु ! राधा पोळें !

कृष्ण देह ! राधा बाहू !
कृष्ण राई ! राधा 'कुऽहू' !
कृष्ण भाल ! राधा बिंदी !
कृष्ण हात ! राधा मेंदी !

# मुठींत माझ्या बंद तुफान !

असाच आहे मी बेछूट.
करितो आयुष्याची लूट।
मधुनिच जखमी हृदय विव्हळे—
' येथुन तेथुन सारें झूट !'

कधी कधी माझी ललकार
तरळत जाई क्षितिजापार !
कधी कधी बहरत उठती
माझ्या गीतांचे झंकार !

परी मला आल्यावर भान
माझें थांबवितो मी गान !
कळतें मजला माझी चूक ...
" भिंतीलाही असती कान ! "

आजकाल तर फुलांफुलांत
मजविषयीं चर्चा दिनरात
पण इकडे माझीं गाणीं
गुणगुणते बिजली गगनांत !

कुणी हसे मजला पाहून
मीही मग देतो हासून
( तराजूंत जनरीतींच्या—
जग पाही मजला तोलून ! )

कधी कधी दुःखा भेटून
स्वतःलाच जातो विसरून!
आठवे न मग इतुकेंही
" कोण? कसा? आलो कोठून?"

म्हणती मज संभावित चोर
" तूं झालास भारी मुजोर।"
( कारण मजला घडे उपास
नी त्यांना लाभे 'चतकोर'! )

मधुनि ताठ मी करितो मान
झाल्यावर जागा अभिमान
गर्जत मग सांगतो जगास
" मुठींत माझ्या बंद तुफान!"

## छेड छेड तेंच गीत !

छेड छेड तेंच गीत !
सूर शब्द आठवीत
राहिलें हृदीं दडून,
ओठांतच घुटमळून
रुद्ध या अपूर्णतेंत !— छेड छेड...

आज धुंद चांदरात
निजलेले आसमंत
झुरतों मी आसवांत !— छेड छेड...

तीच छेड तूं लकेर,
फुलविण्या नवी बहार
खिन्न या मदन्तरांत !— छेड छेड...

वेड लागलें जिवास,
विश्व एक स्वप्न–भास
सुप्त भाव जागवीत !— छेड छेड...

जें न पाहिलें कधींच,
दाव मूर्तिमंत साच
मालकंस आळवीत !— छेड छेड...

# मी कसा वेडा !

मी कसा वेडा ! तुला ठाऊक सारें जाहलें !
माझियापाशीं अतां माझें न कांही राहिलें !

वाटलें कांही म्हणावें तूं पुढें आल्यावरी...
बोलण्याआधीच माझें बोलणेंही संपलें !

हें बरें झालें कुणा ठाऊक नाही एवढें
पाहुनी माझी दशा कोणी जरासें लाजलें !

" कोंवळी काया तुझी लावण्य समावेल का ? "
लाजतां तूं घाबऱ्या माझ्या मनाला वाटलें !

घाव तूं केलेस, झाल्या धन्य माझ्या यातना !
काय मी मागूं ? मला आधीच सारें लाभलें !

## एकान्त

तुझ्या माझ्या एकान्ताशीं
जुळे रेशमाची मिठी,
तुला मला निरखिते
फक्त बकुळीची दिठी !

तुझ्या माझ्या आवेगांत
रुद्ध तुझे माझे श्वास,
तुझ्या माझ्या लयीवर
झुले प्रकाशाची रास !

तुला मला पीत आहे
तुझी माझी हालचाल ..
तुझ्या माझ्या अंगावर
फक्त चांदण्याची शाल !

तुझ्या माझ्या नाभींतून
उले कस्तुरीची आग,
तुला मला कुरवाळी
जागी हुळहुळी जाग !

## नभ झुरतें

काल सहज कळली
मज बातमी एवढी
" ऋतुचक्राने घातली
सहा अंगणीं फुगडी. "

दिन संपुनी ये रात
रात सरे हो सकाळ;
माझ्या नकळत पुढें
भराभर जाई काळ !

तुझी लाज .. माझीं स्वप्नें
विसरलों सारें सारें
तुझ्या वेदनेची छाया
माझ्या रूपांत वावरे !

कसें ओळखावें तुला
मला ओळखेना मीच !
माझ्या गीतांची तहान
गेली माघारी कधीच !

तुला खरेंच सांगूं का
माझ्या मनींचें गुपीत ?
तुझ्याऐवजी जडली
तुझ्या व्यथेवरी प्रीत !

जेव्हां माझेंच दुःख
ऐकवितो मैफलींत
नेहमीच तेव्हां नभ
झुरतें एका कळींत !

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम ३८८१४ वि: काव्य.
क्रमांक ९८२४ नों. दि: १५।८।६८.

## गीत तुझें...

गीत तुझें मी आई गाइन
शब्दोशब्दीं अमृत ओतुन.

करून अपुला माथा उन्नत
प्रेमाश्रूंनी धरती भिजवित
तुझ्या यशाचा गुलाल उधळित
चरणरजांना भालीं लावुन.

भावफुलांना पायीं उधळुन
मम प्रतिभेचें झिजवुनि चंदन
आयुष्याचा कापुर जाळुन
तुझें सारखें करीन पूजन.

माझ्या आशा, माझें जीवन
तुझिया ठायीं गेलें गुंतुन
वात्सल्यानें गेलों नाहुन
घेउन तुझिया पायीं लोळण.

कधी नाचऱ्या तरुपर्णांतुन
कधीं हासऱ्या उषःप्रभेंतुन
कधी ठिबकत्या दंवबिंदूंतुन
तुझेंच आई घडतें दर्शन.

नागपुरापासून मुंबई...
बघती सारे तव पुण्याई
" धन्य मराठी माझी आई ! "
–पोर कडेचें करितें गुंजन.

# मिठी

स्वप्न माझ्या वेदनेच्या चांदण्याचें ' ये ! ' म्हणालें !
अमृताच्या पावलांनी रूप भेटायास आलें !

सारखा मी आपुल्या दृष्टींत सामावीत गेलो...
पाहिलें मी एवढें, कीं पाहणें सौंदर्य झालें !

कोंवळ्या लावण्यगंगेच्या मिठीमाजी बुडालों–
बावरें पाते जिवाचें कांपऱ्या श्वासांत हाले !

पाकळी एकेक केली मोकळी माझ्या कळीनें,
विद्ध अंगांगांत गंधाचा खुला जल्लोष चाले !

लाख धारांनी मधाच्या माखला एकान्त गोरा,
ओठ थोडे हालले... अन् चाखत्या मौनांत न्हाले !

लागली तृप्तीमधे ओल्या निखाऱ्यांना समाधी,
आंधळ्या शब्दांस स्पर्शाचे नवे डोळे मिळाले !

चेतले पूजेंत नंदादीप माझ्या वासनांचे –
क्षुद्र हें अस्तित्व माझें कापरावाणी उडालें !

मी झुले मस्तींत माझ्या ! भोवती आभाळ नाचे !
संपला अंधार येथे... तेजही येथे निमालें !

# माहेरवाशीण

मेंदीच्या पानांवर
मन अजून झुलतेंऽ ग
जाईच्या पाकळ्यांस
दंव अजून सलतेंऽ ग

झुळझुळतो अंगणांत
तोच गार वाराऽ ग
हुळहुळतो तुळशीचा
अजुन देह साराऽग

लदबदल्या आवळीस
अजुन तीच घाईऽ ग
चिमणीच्या दातांची
चव अवीट बाईऽ ग

अजून तुझें हळदीचें
अंगअंग पिवळेंऽ ग
अजुन तुझ्या डोळ्यांतिल
मोठेपण कवळेंऽग

आज कसें आठवलें
बघ तुलाच भलतेंऽ ग
मेंदीच्या पानांवर
मन अजून झुलतेंऽ ग
झुलतेंऽ ग !

## कुशींतलें फूल !

शब्द अस्पष्ट...शराबी
हुंकारांत लोपणारे,
मऊ मोकळ्या केसांत
अलगत दडणारे.

धग – कोंवळी...नवखी
बरगड्या पोळणारी,
मौन...तृप्तींत डुंबलें
तृप्ति...अतृप्त...हावरी !

तंतू विव्हल कायांचे
देती परस्परां पीळ
ओठ टिपती हळूच
मानेखालचा हा तीळ.

चांदण्याला लागणारी
श्वासोच्छ्वासांची चाहूल...
कूस बदलत आहे
माझ्या कुशींतलें फूल !

## नेहमीच

नेहमीच करितो मी
तुजला नयनांत बंद
नेहमीच अश्रूंतुन
पळण्याचा तुजसी छंद !

जेव्हां होऊन मस्त
गातो मी मैफलींत
नेहमीच तेव्हां नभ
झुलतें एका कळींत !

नेहमीच घेतो मी
तुजला माझ्या मिठींत
निरखितांच दिसतें पण
मजला माझेंच गीत !

नेहमीच मज माझ्या
दुःखांचा कैफ चढे !
नेहमीच माझें सुख
माझ्या दुःखांत दडे !

नेहमीच म्हणतो मी –
" दुःख दे मला अजून !
हें कसलें दुःख दिलें,
जें आलें सुख बनून ! "

# जुईच्या रे फुला !

कसं सांगू तुला ? कसं सांगू तुला ?
गुज मनांतील जुईच्या रे फुला !

तुला माझी व्यथा कशी रे कळेल ?
बोलण्याआधीच वेळही टळेल !

सोडून इतर फुलांचा बहर
तुजवरच कां खिळली नजर ?

कधी कधी वाटे, " करी का मी पाप ?
माझ्यासाठी का हें लावण्य निष्पाप ? "

कांही केल्या माझें मन आवरेना,
समजून सारें कांही समजेना !

ऐकशील कां रे माझी एक आस ?
बनूं दे रे मला तुझाच सुवास !

लाजशील किती लाजून लाजून ?
लपशील किती, लपून लपून ?

पानांच्या दाटींत ... फुलांच्या थव्यांत ...
तुजला शोधत धावे माझी प्रीत !

तुझी उमलती सुगंधित लाज
बनली माझिया वेदनांचा साज !

तेव्हां होतें मज अपुरें गगन,
आज तुझी लाज जाहली बंधन !

तेव्हा होतें सारें जग माझें घर,
आज तुझा गंध ... माझें कारागार !

सांग आतां कशी घेऊं मी भरारी
तीर परागाचा बाळगुनी उरीं ?

## आता कोठे—

आतां कोठे वसंताचीं
पडूं लागलीं पाऊलें !
जरा व्हावया लागलीं
कांही कलिकांचीं फुलें !

आतां कोठे डंवरला
आमराईत मोहर,
आतां कोठे शिकलीस
सावरायास पदर !

आतां कोठे पानोपानीं
वारा लागला फिराया,
आतां कोठे जरा जरा
तुला लागलें कळाया !

आतां कोठे कोकिळेला
लव फूटलाहे गळा,
आतां कोठे आकारल्या
तुझ्या नव्हाळीच्या कळा !

आतां कोठे ऐकताहे
नभ धरणीच्या कथा,
आतां कोठें उघडली
तूंही लावण्याची गाथा !

आतां कोठे सुगंधास
हसूं फुटलें वनांत
आणि समजूं लागलें
तुला माझें मनोगत

# कांटा

वक्षांत सौरभाच्या
हेलावतात लाटा
हा कोणत्या फुलाचा
बोचे मधाळ कांटा ?

माझ्या मुक्या मनाच्या
गेल्या जुळून तारा
शब्दांविणा स्वरांचा
ओथंबतो किनारा

मी जाणता न माझें
अस्तित्व गीत झालें
अंगांग वेदनेचें
एका स्मितांत न्हालें

दूरावल्या क्षणांच्या
आल्या समीप छाया
माझ्या जुन्या खुणांना
मी लागलो स्मराया

का गुर्फटून गेल्या
रक्तामधेंच वाटा ?
हा कोणत्या फुलाचा
बोचे मधाळ कांटा ?

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. ११७६५
शाखा

## ८ पुन्हा वीज चमकली !

कितीतरी दिवसांनी आज थांबला पाऊस !
रंगीबेरंगी फुलांना लागे प्रकाशाचा ध्यास !

आज बऱ्याच दिसांनी झालें मोकळें आभाळ !
दूर तरळे ढगांची शुभ्र मुलायम माळ !

किती दिसांनी पडलें ऊन्ह पिवळें धमक,
किरणांच्या वर्षावांत न्हाते सांवळी सडक !

सुरू जाहली फिरून थांबलेली रहदारी,
पाय कराया मोकळे मीही निघालो बाहेरी !

आणि पाहतां सहज जरा मान वळवून,
कैफ जुनाच दाटला माझ्या नसांनसांतून !

तोच मोहक चेहरा त्याच गोड खळ्या गालीं,
"आलें भरून आभाळ पुन्हा वीज चमकली !"

# हें माझें अग्निगीत !

भडके हृत्स्थंडिलांत
हें माझें अग्निगीत !

एक शब्द, एक ओळ
क्रुद्ध क्षुब्ध तप्त लोळ
चूरचूर विश्वगोल
निजभीषण तांडवांत !— हें माझें...

फुललेल्या डोळ्यांतुन
आवळल्या ओठांतुन
फासांतील कंठांतुन
भिरभिरते त्रिभुवनांत !— हें माझें...

येथ भावना ज्वलंत
हासतात बंधमुक्त
प्रलयाच्या कौतुकांत
दुबळ्यांची खाक प्रीत !—हें माझें...

एक ऐकतां लकेर
धुंद कांपती थरथर
डगमगतो धरणीधर
हादरतो लोकनाथ !— हें माझें...

निढळाच्या घामांतुन
धगधगत्या श्वासांतुन
त्वेषाच्या आगींतुन
जाई जें ओसंडत !— हें माझें अग्निगीत !

# झुरणी

कसा अचानक भलत्या वेळीं
रिमझिम रिमझिम पाउस पडला ?
सरसर सरसरूनी आली सर,
काय परतुनी श्रावण आला ?

बघतां बघतां हां हां म्हणतां
झाकाळुन गेलें अवघें नभ !
आणिक उसळून आला वरती
धरतीच्या गीतांचा सौरभ !

मज विव्हल आकाश म्हणालें –
" तुझ्यासारखी माझीहि गत
माझें माझ्यापाशीं असुनी
कधींच नाही मिठींत गवसत "

काळ्या काळ्या मेघांआडुन
क्षणभर चमकुन गेली बिजली
जणूं मोकळ्या केसांमधुनी
पाठ तुझी मज गोरी दिसली !

अशाच मादक वेळीं मजला
कशास यावी तुझी आठवण ?
गडगडतें बाहेर जरी नभ
धडधडतें इकडे काळिज पण !

ऐन हिंवाळ्यामधल्या रात्रीं
कां अवचित कोसळल्या धारा ?
तुला काय त्याचें ? इकडे पण
झुरला माझा जीव बिचारा !

# किनारा

त्या पैलतिरावर मिळेल मजला थारा
सुहृदांची प्रेमळ सोबत आणि उबारा

इकडच्या तटावर झाले ध्वस्त निवारे,
जळतात पावलाखाली क्रुद्ध निखारे,
मी तळमळतांही निर्विकार जन सारे,
पण तिथे वाहतो प्रसन्न शीतल वारा !

ऐकली न येथें आपुलकीची बोली
बहरली न आशा मनांत अंकुरलेली
सारखी विफलता व्यथा माझिया भालीं
पलिकडे हासतो जीवन-श्रेय-फुलोरा !

पलिकडे मनोमय स्वप्नांचा संसार !
पलिकडे सुगंधित गीतांचा झंकार !
संतत उरास्तव वत्सल अमृतधारा !
बहरला मळ्यांनी वैभवपूर्ण किनारा !

# मोहर

तूं आल्यावर......
एकसारखे नयन पाहती तुला उपाशी
आणिक तूंही मजला पाहत लाजत जाशी
खस्याळ माझ्या नजरेपुढती लपे न कांही
दिसावया जें नको तेंच पण उघडें होई !

तूं आल्यावर......
कुठुन तरी ये प्रसन्न दरवळ तरळत तरळत
जणू पावलासंगे जाती सुमनें उमलत
श्रवणीं येई मधाळलेलें लाडिक कूजन
गमे तुझें लावण्य ठिबकतें तव शब्दांतुन !

तूं आल्यावर......
तुझ्या कोंवळ्या कायेचा ये सुगंध जवळून
अंतरांत ये हवीहवीशी व्यथा उफाळून
उरली सुरली शुद्धबुद्ध मग जाई हरपून
मिळे मला ब्रह्मांड जरासें हृदय गमावून !

तूं आल्यावर...
पुन्हा एकदा दिसे निरागस रूप अनाघ्रात
पुन्हा एकदा घाव उरीचे होती जागृत
पुन्हा एकदा कवितेला ये माझ्या मोहर
तूं आल्यावर... तूं आल्यावर तूं आल्यावर !

# मधुराणी

“ बघ पहाट झाली, ऊठ गडे मधुराणी ! ”
पिंजऱ्यांतिल राघू बोले मंजुळ वाणी.
जाहली पुरेशी ऊब तुझ्या कायेची,
बाहेर लाजतें फुलाफुलावर पाणी !

गुंतवूं नको ग आज तुझ्या करपाशीं,
मी असा कलंदर दुनियेचा दरवेशी
‘ जय अलख निरंजन ! ’ म्हणेन दारोदारीं,
‘ द्या माई तुकडा ! ’ किंवा कधीं उपाशी !

होई न पापणी मदभाराने वरती !
ओसंडत जाई कायेमधुनी नवती !
हा अपूर्वतेने सजला रंगमहाल.
दे निरोप तरिही — क्षितिजें हीं मज कोतीं.

## भाऊबीज

उद्याचीच भाऊबीज
कोण मला ओवाळील ?
कोण ओवाळणीसाठीं
मजसवें झगडील ?

इथे आज पडलो मी
माझ्या गांवाहून दूर
'कुणा घालूं ओवाळणी ?'
लागे मना हुरहूर.

इथें साऱ्याच बहिणी
परक्या या नगरांत,
परी असे निराळीच
माझ्या बहिणीची प्रीत.

कसें बहिणीचें नातें !
कशी बहिणीची माया !
ओवाळणी मागतसे
सालभर भांडुनीया ! !

उद्याचीच भाऊबीज...
महोत्सव घरोघरीं,
आणि पाहीन हें सारें
एकटाच वेड्यापरी !

# दुःख माझें

दुःख माझें —
माझियापाशीं असू दे !
तें बिचारें एकटें जाईल कोठें ?
मी असोनी
कां अनाथासारखें त्यानें फिरावें ?

माझियावांचून त्याला
आसरा आहे कुणाचा ?
जन्मलो तेव्हांपुनी
श्वानापरी
माझ्याच मागे राहिलें तें !

दुःख माझें —
माझियापाशीं असूं दे !

# जुन्याच जखमा

जुन्याच जखमा मोजत बसलो,
नवीन जखमा कितीक होतिल !
कोठवरी मी रडत बसावें ?
घाव करित जन असेच हसतिल ?

अता न गाइन मी रडगाणें ?
अता न येइल नयनीं पाणी !
दूर असें मुक्काम परंतू
संगे माझी कविताराणी !

जर सुटलें मार्गावर वादळ
वा झालें कडकडुनी गर्जन,
म्हणेन, मी " माझ्या कवितेचें
गगन करी लखलखतें पूजन ! "

## पायांना श्रेय मिळे

चिणलेल्या वाटेवर
माझें पाऊल पडे
पुढती आभाळ पळे
मागे प्रारब्ध अडे.

पोलादी पिंजऱ्यांत
काळोखा सूर्य जळे
नसणाऱ्या छायेचा
दिसण्याचा सोस टळे.

दूर ... खुज्या स्वप्नांचें
किरकिरतें बाभुळवन
चिंवचिंवती शून्यपिलें
कांट्यांच्या घरट्यांतुन.

तरीहि मी चालतोच
घेऊन मज खांद्यावर
पायांना श्रेय मिळे
मातीभर ... मातीभर !

## –आणि तरीहि

वाट संपली परंतु
सरसावलीं पावलें,
मात्र विरक्त पाठीला
डोळे ओढाळ फुटले !

कडमडत म्हणाली
अंग दुमडुन ठेच,
" हेंच घडलें आणिक
पुढे घडायाचें हेंच ! "

...एक चिणलेला क्षण
डोकावला चिऱ्यांतून
जुन्या खंती केकाटल्या
रितीं पोटें बडवून !

आणि तरीहि जिवाचा
केवढा हा आटापिटा !
मागे ' मागचें ' टाकाया
शोधी भिंताळल्या वाटा !

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम ३६८९४ दि: २११८७
क्रमांक १६२४ नों दि: २५।८।८७

## दुःखांनो

तुमची माझी जुनीच ओळख
तुमचें माझें जुनेंच नातें,
कुणी न मजला म्हटलें अपुलें...
तुम्हीच होतां एक चहाते !

कुणी न माझें, कुणी न माझें,
तुम्हीच माझें सारें सारें !
अवघें जग म्हणजे केवळ
जाण्यास्तव येणारें वारें !

तुम्हीच कोमेजुन गेलेल्या
गीतांना दिधलें संजीवन,
तुम्हीच मज हासविण्या येतां
नसानसांतुन माझ्या बहरून !

तुमच्या या वेदनाच देती
मजला जगण्यासाठीं अमृत,
एक एक घावाने होई
तार तार हृदयाची झंकृत !

तुमच्या पुण्याईने आलें
काल मला भेटाया अंबर,
म्हणूं लागलें मज आवर्जुन,
" तुझें हृदय मज दे रे क्षणभर ! "

तुम्हीच मजला दिलें शोधुनी
माझें हारपलेलें ' मी-पण ',
गर्व माझिया कवितेमधला
तुम्हीच केला मजला अर्पण !

तुम्हीच स्पंदन वक्षामधलें
माझ्या अस्तित्वाचें कारण ;
तुम्हावाचुनि मज करमेना
तुम्हास करमेना माझ्याविण !

दुःखांनो द्या धीर असा कीं,
करून मुजरा म्हणेल ईश्वर–
" तुझें गीत आहे शाश्वत पण
देवत्वच माझें क्षणभंगुर ! "

## ही जुनीच पाउलवाट

ही गर्द दुतर्फा झाडी
तरुपर्णें हिरवीं पिवळीं
कवडशांत रंगुन गेली
मधु करवंदीची जाळी.
ही जुनीच पाउलवाट !

वळखितो रान भवतीचें
येथलें पान नि पान
दे अजुन मला वनजाई
टपटपतें यौवनदान.
ही जुनीच पाउलवाट !

कधि चुंबित रानफुलांना
वा सांगत गोड कहाणी
हसवीत म्लान पाचोळा
चालली पुढें वनराणी.
ही जुनीच पाउलवाट !

कां मनांत नसता माझ्या
मज समोर खेचत नेई
ये अजून कानीं कुऽ हूऽ
हां, तीच जुनी वनराई.
ही जुनीच पाउलवाट !

आठवे न सर्व, कुणीसें
कुजबुजतें मात्र सभोती
येथेच दोन वेड्यांचीं
पाउलें उमटलीं होतीं.
ही जुनीच पाउलवाट !

## ज्वलन्त मी तर एक निखारा

नाही नाहत मला चांदणें
तळपे भानू डोईवरती
अमृत बनलें जिथे हलाहल
कुठली कविता, कुठली प्रीति !
स्वतः पेटुनी पेटविणारा
ज्वलन्त मी तर एक निखारा !

मुर्दाडांचें मला वावडें
हृदयीं लाव्हा होत अनावर
या दुनियेची चीड येउनी
ओंकाराचा बनलो गहिंवर
ओल्या डोळ्यांतून पुकारा –
ज्वलन्त मी तर एक निखारा !

हासत गाइन हे अन्याय
तव छातीवर पाउल रोवुन
आणि जेलच्या दगडी भिंती
त्या गीतांची करतिल गुणगुण
राखेंतूनही लखलखणारा –
ज्वलन्त मी तर एक निखारा !

चिरविस्मृत जीवनमूल्यांच्या
निःश्वासांचा एक पेट मी
नव्या जगाच्या प्राजक्ताचें
इवलें चिमणें लाल देठ मी
अंतरांत कल्पान्त फुलोरा –
ज्वलन्त मी तर एक निखारा !

कवी अहो मी असा रांगडा
मज ठाव न शब्दांची कसरत
मात्र पेटल्यावरी ठिबकतें
झरणीमधुनी डायनामाइट
    मानवतेस्तव देत पहारा –
    ज्वलन्त मी तर एक:निखारा !

## हद्दपार

जगताच्या सीमांतून
झालो मी हद्दपार !
ज्याने त्याने केलें
मज बघून बंद दार !

मार्गी जन गर्जलेत
" पाप घोर ! पाप घोर ! "
गुणगुणतां एक ओळ
ठरलो मी बंडखोर !

हाच गुन्हा झाला कीं
माझी झुकली न मान !
झालो नाही कधींच
हृदयाशी बेइमान !

हें इमान राखाया
कवितेने धीर दिला,
दुर्दैवाची झाली
सोबत वाटेंत मला !

गगनांतुन आली मग
साद एक लखलखती—
" रे पथिका ! जा असाच !
मी तुझिया सांगाती ! "

तोंच कुणी कुजबुजलें
" कां मुशाफिरा हताश ?
गात गात जा असाच,
सरला तम ! मी प्रकाश ! "

किलबिलाट विहगांचा
भिरभिरतां अंबरांत,
संचरलें संजीवन
थकलेल्या पावलांत !

आलें माझ्या मनांत
हें इतुकें असल्यावर,
ठरलो मी भाग्यवंत !
झालें जग हद्दपार ! !

# वेगळा मी

मान मी उंचावली आहे पुन्हा,
मी करी मंजूर हा माझा गुन्हा.
यापुढेही हा गुन्हा आता घडो,
सारखा याचा जगीं डंका झडो !

हा पसारा मांडिला कुणी फुका ?
आणि अस्तित्वासही अस्तित्व कां ?
पाहतो जेथे दिसे तेथे व्यथा
विश्व हें अज्ञान अश्रूंची कथा !

वाटलें सारे बघूनी चेहरे
जें दिसे दृष्टीस तें नाहीं खरें,
बोलण्यासाठीं नसे हें बोलणें
हासण्यासाठीं नसे हें हासणें !

पाहिलें मी... घाम पोलादा फुटे...
माणसाला धीर देती संकटें,
पाहिलें... तेजास आली काजळी
पाहिलें... रांगेंत पोटार्थी बळी !

देव झोपे गाढ आकाशांतला
आंधळा चाले जगाचा काफला
एकटा मी काय साऱ्यांचें करूं ?
हें ' असें ' आहे, कसें मी विस्मरूं ?

बंडखोरी माझिया रक्तांतली
शेवटीं साह्यास माझ्या धावली
काळजाला एवढें आता कळे
बेगळा मी आणि तुम्ही वेगळे !

## तुटलेल्या पंखांस—

तुटलेल्या पंखांस पुन्हा आकाश दिसावें,
वज्रालाही सुमनांचें सामर्थ्य कळावें,
दुबळ्यांचा दबलेला संताप उसळुनी
सम्राटाने तख्तावर चळचळ कापावें !

सिंधूला जलबिंदूचें आव्हान मिळावें !
गगनावरही धरतीचें साम्राज्य रहावें !
तृणांकुरांचा लवलवणारा धीर पाहुनी
हिमालयाचें मस्तक आपोआप झुकावें !

पुन्हा विळ्याने तराजूस पाणी पाजावें,
पुन्हा पहारीपुढे तिजोरीने हादरावें
जुन्या दैवतांची सरतां सारी पुण्याई
पुन्हा एकदा हें अवघें जग पावन व्हावें !

पुन्हा तमाच्या छातीवरती तेज बसावें
पुनरपि जीवन मरणाचेंही मरण बनावें !
युगांमागुनी युगें तपश्चर्या केल्यावर
पुन्हा मानवाचें दर्शन देवास घडावें !

पुन्हा माणसाने माणूस म्हणून जगावें !
पुन्हा एकदा सौंदर्यच विश्वांत उरावें !
अम्हास होतां अमुच्या सामर्थ्याची जाणीव
तुटलेल्या पंखांस पुन्हा आकाश दिसावें !

## माझें स्मित हरपलें !

माझें स्मित हरपलें !
पाहिलें का कुणीतरी ?
अहो हें न माझें हासूं
पाहतां जें ओठांवरी !

माझें स्मित हरपलें
कांही केल्या गवसेना
शोधूं तरी कसें आज
मला मीच सापडेना !

माझें स्मित हरपलें !
काळ लोटला बराच !
वेष हासण्याचा घेई
माझ्या यातनांची आच !

माझें स्मित हरपलें
झालें सारें नकळत
कुणास मी दोष लावूं
माझी सारी चूक यांत !

माझें स्मित हरपलें
वागतो मी वेड्यागत,
दडलें का सांगा मज
गुलाबाच्या पाकळ्यांत ?

" माझें स्मित हरपलें ! "
केला आक्रोश जगांत.
कुणी बोललें हळूच
" शोध माझ्या नयनांत. "

# निर्धार

माझिया गीतास द्वेषाचा जुना आधार आहे !
माझिया द्वेषास विश्वाच्या व्यथेची धार आहे !

चालते माझी शिलेदारी जनांसाठीच माझ्या,
गीत माझें माझिया हातांतली तलवार आहे !

मी भविष्याचा प्रवासी ! मी पहाटेचा उजाळा !
गांजलेल्यांच्या घृणेचा एक मी उच्चार आहे !

एकटा आहे कुठे मी ? एकटा होतो कधी मी ?
फौज मागे राबणाऱ्यांची उभी झुंजार आहे !

हेलकावे मी, पुढें येतां मिठी साऱ्या फुलांची,
हें बरें झालें...इथें माझ्या उरीं अंगार आहे !

लोक हे साधेसुधे कोट्यावधी 'सर्वस्व' माझें,
...लावुनी खांद्यास खांदा मी पुढे जाणार आहे !

ओंजळीमाजी जनांचीं आंसवें मी साठवितो !
आर्त त्यांच्या वेदनांचा एक मी झंकार आहे !

जाणतो मी—देवकीच्या तान्हुल्यांचा सूड घ्याया
कृष्ण साऱ्यांचा पुन्हा या गोकुळीं येणार आहे !

सारखी ही बंडखोरी चालली माझी कधीची;
क्रुद्ध विश्वाने दिलेली एक मी ललकार आहे !

सज्ज त्यांच्या पल्टणी होवोत रोखाया परंतू –
मी जनांच्या अंतरींचा जागता निर्धार आहे !

# रंगेल कलंदर

या गांवाहुन त्या गांवीं गुंडाळुन गाशा
पाहत गेलो " मी ! मी ! " चा फडतूस तमाशा
मोजत गेलो आशेच्या मापांत निराशा
मी बेपर्वा, एक मस्त रंगेल कलंदर !

मला सारखे दिसले ' फादर, पंडित, मुल्ला
आपआपला सांभाळत भरलेला गल्ला
बरळत होते ' राम राम ! या अल्ला !'
मी बेपर्वा, एक मस्त रंगेल कलंदर !

सगेसोयरे माझे सारे कधीच मेले
पिंडदानही त्यांचें मी आक्रंदत केलें
ते गेले अन् उपकारांचें ओझें गेलें
मी बेपर्वा, एक मस्त रंगेल कलंदर !

## घृणा

लोचटांनी पाय चाटावे तुझे
भेकडांनी शब्द झेलावे तुझे
गोष्ट त्यांच्याहून माझी वेगळी
रे, जगा! कां गीत मी गावें तुझें ?

रे, तुझें नाहीं इमानी श्वान मी
ठेवतो ही ताठ माझी मान मी!
मी धरेचा पुत्र! ह्या मातीमधे—
लोळवीनच माजलें अस्मान मी!

बाळगावी कां कुणाची लाज मी ?
झिंगतो कैफांत माझ्या आज मी
ठेव अंधारा तुझ्यापाशींच तूं,
बंद तेजाचा खुला आवाज मी!

वाकणारे वाकले, हासून घे!
आणि लाचारांस लाथाडून घे!
रे, तुझ्या तोंडावरी मी थुंकतो,
चेहरा माझा जरा पाहून घे!

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. ११७८६५


## आपुल्या कैफांत मी !

माझिया पायांवरी आकाशगंगा लोळते
चेहरा माझा कधी आभाळ हें कुर्वाळितें
झोकही जातांच माझा विश्व होई घाबरें
झिंगतो मी, पुण्यही पापांत माझ्या झिंगतें !
आपुल्या कैफांत मी !

आज माझ्या भोवतालीं सूर्य घेई रिंगणें
गुर्फटाया लागलें शब्दांत माझ्या चांदणें
अन् तरी माझा मला कां आठवेना चेहरा ?
बैसलो फेडीत सारीं सात जन्मांचीं ऋणें !
आपुल्या कैफांत मी !

लाखदा झोपूनही अस्तित्व जागें होतसे
आणि अंधारांत केव्हां चुळबुळे माझें पिसें
पालवी रक्तास तेजाचीं फुटाया लागते,
लोक सारे बोलती कीं, हें असें होई कसें ?
आपुल्या कैफांत मी !

हिंडते चौफेर माझी धूळ शोधाया मला
केवढा आक्रोश वाटांचा फुकाचा चालला
दूरचे पल्ले जरा डोळे पुसाया लागले...
कालच्या कांही क्षणांना भास माझा जाहला !
आपुल्या कैफांत मी !

## कां मैफलींत गाऊं ?

साऱ्याच यातनांना कां एकलाच साहूं ?
सोशीत घाव सारे कां मी असाच राहूं ?

तूं सांगशी हसाया, हासेन मी परंतू
तूं सांग, आसवें हीं कोठे जपून ठेवूं ?

ऐकून शब्द माझे तूं लाजशी परंतू
तूं सांग, लाजणें हें डोळे भरून पाहूं ?

पाहूनही तुला गे पाहूं तरी किती मी ?
या रूपसागराला नेत्रीं कसा समावूं ?

चर्चा जगांत चाले, "कांही न यास झालें !"
माझ्या व्यथा इमानी, कोणी रडे दिखाऊ !

रे अमृता तुझा, झालो तरंग झालो
ओझें तुझ्या व्यथेचें आता कशास वाहूं ?

माझें तुझें निराळें कांही जगांत नाही !
हें गीत आपुलें मी कां मैफलींत गाऊं ?

# सरलें वादळ

सरलें वादळ !
उरली तरुपर्णांची सळसळ !

बसे बिचारा
हिरमुसला कोपऱ्यांत वारा !

कापत थरथर
सुमनें बघती डोकावुन वर !

जलाशयावर
मधुनि उमटती तरंग मंथर !

इकडे हा वड
शांतवितो हृदयाची धडपड !

घराघरांतुन
गोजिरवाणीं आलीं धावुन !

अताच कोठे
सावरलीं ज्वारीचीं ताटें !

ओसरली सर !
झळके आरसपानी अंबर !

पिऊन धारा

मृद्‌गंधाला फुटे धुमारा !

दूर कुठे पण

तळमळते बिजली शब्दांविण !

## व्रत

आलास उद्धराया तूं –    आधी दंभ तुझा गळो
तुझें पुण्य तुझ्यापाशीं    माझें पाप मला मिळो !

अगा भोळ्या पुण्यवंता,    माझीं पापें स्थिरावलीं
अभिलाषेची मजला    समाधी दिव्य लागली !

शांतलो पूर्ण मी आता ... उरलीं फक्त वर्तुळें
धुमसे कोण तळामाजी    तळाला गांजल्या कळे !

चांदण्यांतील स्पर्शांचीं    पाखरें कूजती मनीं
तृषार्त क्षण ( गेलेले )    प्राशती जल चंदनीं !

वेदान्त अनुतापाचा    ठेव रे ठेव तूं दुरीं
लागली दर्वळायाला    व्यथेची कस्तुरी उरीं !

मी तुझ्या तीव्र शापाचें    एवढें व्रत पाळलें —
सुख घेत कवेमाजी    दुःखाचे ओठ चुंबिले !

## एक छटेल गौळण !

समाधिस्थ ज्ञानदेव
चुळबुळाया लागले,
मूळ अजान वृक्षाचें
चिरे फोडून घुसलें !

एकनाथ हिशेबांत
करी पुन्हा पुन्हा चुका,
आजवरीचें अध्यात्म
गेलें अगदीच फुका !

वेड्या आशांचें दळण
जनी जात्यावर दळे,
विद्ध वैफल्याचें पीठ
भराभर खाली गळे !

लुळ्याबुळ्या वेदान्ताचें
मढें लावूनिया उरीं
कुणी भोळा तुक्यावाणी
फिरे इंद्रायणी तीरीं !

बरें झालें ! पांडुरंगा,
नाहीं गाइलें मी गुण,
माझ्या मोक्षाला पुरेशी
एक छटेल गौळण !

## शंका

धन्य, देवा ! धन्य तुझी
मुळी उमजेना लीला,
कसा जित्या माणसांचा
तुवां बाजार मांडिला !

वेगवेगळ्या नगांचे
वेगवेगळाले दर,
याचा हजार टिकल्या —
त्याचा केवळ शंभर !

देत नाहीत दमड्या
गिऱ्हाइकें सुखासुखीं,
त्यांच्या गरजेनुसार
ठरे नगांची लायकी !

त्यांना हवेत हमाल
त्यांना हवेत गुलाम !
मन मारून आपुलें
त्यांचें करणारे काम !

भले ! भले ! जीते रहो !
शाबास रे बहाद्दरा !
सांगतोस "झुका किंवा
टाचा घासोनिया मरा !"

मज कळलें, आहेस
सचोटीचा तूं व्यापारी,
सांग फेडशील कधी
माझ्या दुःखाची उधारी ?

गड्या, तुझी कोठवर
चालायाची थापाथापी ?
हात तुलाही दाखवूं
आम्ही इरसाल पापी !

आणि कधी ( माफ कर ! )
शंका जाई डोकावून,
" आहे तुझाही ठरला
दर आमुच्या समान ! "

## नाहीतर—

अंधाराच्या पाकळ्यांना
नुकताच कोठे सुटूं लागला आहे
प्रकाशाचा सुगंध !

आणि...

माझ्या व्यथेचे डोळे झाकले आहेत
गीतांच्या चंदेरी पापण्यांनी !
नाहीतर...कधीच...

कधीच खाली पडला असता
भविष्याच्या वाकल्या पाठीवर बसलेला
भूतकाळाचा...

हिशेबी दगड !

## चेहरे

दिसतात रस्त्यावर
अनोळखी पण ओळखीचे
माझे चेहरे ...

थकलेले,
ओढलेले,
शोधून आणलेल्या पराभूत हास्यांच्या सावल्यांत रडणारे

आवाज नसलेले त्यांचे आंधळे हुंदके
हरवतात
वाहत्या पोटभरू जंगलांत
घरट्याच्या काड्या वेचतांना
चेहरे ...

## तडजोड

तूं —
ह्या चार भिंतींआड माझ्याशीं बोलतांना
आपलें लाचार थोबाड विचकीत
गालांवर थबथबणारा
आत्मसंतुष्ट दर्पाचा तवंग पुसण्याचा प्रयत्न करीत—
बुळबुळीत शब्दांवर
सावरीत आहेस आपला पराभूत तोल,
पण मला कांहींच उमगत नाही !

फक्त — तुझ्या जागीं
सारखा. . .सारखा दिसूं लागला आहे...
एकच...
बटबटीत बेडूकडोळा...
    किंचाळणारा —
"माझ्या गरुडपंखांनीं
कधीच केली नाही
डबक्याशीं तडजोड !"

## मायबोली

लाभलें अम्हास भाग्य बोलतो मराठी
जाहलो खरेंच धन्य ऐकतो मराठी
धर्म, पंथ, जात एक जाणतो मराठी
एवढ्या जगांत माय मानतो मराठी

आमुच्या मनांमनांत दंगते मराठी
आमुच्या उरांउरांत स्पंदते मराठी
आमुच्या नसांनसांत नाचते मराठी
आमुच्या रगांरगांत रंगते मराठी

आमुच्या पिलांपिलांत जन्मते मराठी
आमुच्या लहानग्यांत रांगते मराठी;
आमुच्या मुलांमुलींत खेळते मराठी
आमुच्या घरांघरांत वाढते मराठी

आमुच्या कुलांकुलांत नांदते मराठी
येथल्या फुलांफुलांत हासते मराठी
येथल्या दिशादिशांत दाटते मराठी
येथल्या नगानगांत गर्जते मराठी

येथल्या दरीदरींत हिंडते मराठी
येथल्या वनांवनांत गुंजते मराठी
येथल्या तरुलतांत साजते मराठी
येथल्या कळीकळींत लाजते मराठी

येथल्या नभामधून वर्षते मराठी
येथल्या पिकामधून डोलते मराठी
येथल्या नद्यांमधून वाहते मराठी
येथल्या चराचरांत राहते मराठी

...धर्म पंथ जात एक जाणतो मराठी
एवढ्या जगांत माय मानतो मराठी.

# अजुनीही ...

पहाटेची वेळ गोड थंडीचा बहर
पाखरांची किलबल चालली मधुर
एक कळी दूर लाजे ओल्या गवतांत
अजुनीही घुटमळे नीज नयनांत !

दंवबिंदू फुलांतील चुंबितो प्रकाश
नवीं स्वप्नें रंगविते
चांदण्यांची दूर गेली निघून वरात
अजुनीही आठवते 'रंगलेली रात'.

गुरांवासरांची चाले धांदल गोठ्यांत
चरवींत चुरूचुरू धारा वाजतात
घरोघरीं भूपाळीची गोड सुरवात
उजाडलें ! शेतकरी चालले शेतांत.

अंगणांत पारिजात करी बरसात
डोकावती सोनियाचीं किरणें घरांत
कोमेजला दोन पानांआड निशिगंध
उतरली तरी नाही डोळ्यांतील धुंद.

## पहाट

झाली सखे पहाट, जाग ! रात संपली !
ही सोड मोकळी मिठी मधाळ आपुली !

ओलावलीं जरी दंवांत लाजरीं फुलें
येथे तुझ्या नसांनसांत रात झिंगली !

जागून झोपलो, मधून जागलो पुन्हा
हें चाललें असें...अशीच रात रंगली !

आता कुठे मला कळावयास लागलें
ह्या शीत चंदनांत आग गोड साठली !

बाहेर मंद चांदण्यांत पातली उषा
माझ्या कुशींत मात्र चंद्रकोर झोपली !

## संक्रांत

कित्तीतरी दिवसांचा
आज तोडून अबोला,
बोललीस आर्जवून
" गडे, गोड गोड बोला ! "

कसा तुझ्या बोलण्यांत
आला इतुका गोडवा ?
कसा होऊन गुलाबी
बोले माझ्याशीं हलवा !

घेतां हलवा गुंतलीं
जेव्हां बोटांमध्यें बोटें...
उभे अंगांगीं राहिले
तुझ्या हलव्याचे कांटे !

काय जुन्याच गोष्टींची
झाली नवी सुरवात ?
...पुन्हा अबोला आणिक
पुन्हा बोलणें मधांत !

## माझ्या खुळ्या आसवांनो—

माझ्या खुळ्या आसवांनो
करीतां कां उभा दावा ?
जनांपुढे उधळीतां
माझ्या यातनांचा ठेवा !

माझ्या सखया एकान्ता,
तुजही न माझी कींव
दिलासा न दिलास तूं
परी...नकोसा आठव !

माझ्या नयनींच्या रूपा
अखेरीस केला घात !
नकळत आलास तूं
डोळ्यांतून हृदयांत !!

कविते ग ! तूंही दिला
मज भाबड्यास दगा
माझ्या व्यथांस कासया
दिली निजान्तरीं जागा ?

## गाशी माझेंच गीत

कळलें मज आजकाल
गाशी माझेंच गीत !
गा बाई ! बघ चुकून
मजवर करशील प्रीत !

एकेका शब्दांतून
माझें मन तुज दिसेल !
तुजशिवाय झुरणारें
अंतरंग तुज कळेल !

कळलें मज गाशी तूं
कैफांतच सावकाश,
जणु मी तुजभवताली
आवळले बाहुपाश !

कळलें मज गातां तव
येई नयनांत नीर,
बनते एकेक ओळ
काळजामधील तीर !

कळलें मज बसवलीस
फारच तूं गोड चाल,
गातांना तव मधेच
होती आरक्त गाल !

ठाऊक कांही तुला न
प्रीतीची ही न रीत
दूर ठेवूनी मलाच
गाशी माझेंच गीत !

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत
अनुक्रम ...३५८९४... वि: ...काव्य...
क्रमांक ...१६२४... नों दि ...१५/८६४...

# तीन रूबाया

वाट येथे संपली! ही वाट येथे संपली !
राहिली कोठेतरी मागेच माझी सावली !
अन् तरी थांबूनही संपे न माझें हिंडणें,
हाय! माझ्या पावलांना दृष्ट माझी लागली !

काळजाला झोंबती अंधारलेलीं वादळें !
बैसती मानेवरी मागील जन्मांचीं पळें !
नाचती वाऱ्यावरी बेभान प्राण्यांच्या दशा....
कां परी अद्यापही ओलींच जाईचीं दळें ?

मीच माझा चेहरा अन् मीच माझा आरसा !
जाणतो मी पाहुनी माझ्यांत– मी आहे कसा.
रूप माझें लाखदा मीं पाहिलें आहे तरी,
सांगती कानांत सारे....तूं असा अन् तूं तसा !

## ऊन्ह

काय बेटें ऊन्ह आहे!

धडधडीत माझ्यासमोर
सकाळची संधि साधून...
( तुला एकटीच पाहून )
तुझ्या अंगांगाला बिलगत
मला अंगठा दाखवीत आहे!

काय बेटें ऊन्ह आहे!

## गाऱ्हाणें

मीच
माझ्याभोवती
हुंदक्यांच्या भिंती उभारून
ऐकवीत आहे —
माझ्या बंदिवासाचें गाऱ्हाणें
मलाच !

## एवढेंच

आतां सांगायचें राहिलें एवढेंच :
जें तुला सांगणार होतो... सांगितलेंच नाही !
मी गेलो पुढे
सांगणें राहिलें मागे
तुझ्याजवळ !

## खोपा

आठवतें —
बांधला होता
उगीच आपला
अंधाराच्या किनाऱ्यावर
वाऱ्याच्या निसटत्या वाळूंत
चिमणीचा खोपा
लपण्यासाठी !

## पण

मी म्हटलें
अगदी सहज
" जुळवशील का माझ्या
इंद्रधनुष्याचे वितळलेले तुकडे ? "

आणि मग —

कित्ती पण संतापलीस !
पण त्यापूर्वी
बनायचे होतेस
एकदा तरी
माझे डोळे !

# जाग

लागली बघ
पहाटेच्या ओठांना
रात्रभर
नक्षत्रांचीं गाणीं गाऊन थकलेल्या
तुझ्या तृप्त डोळ्यांतील
जाग !

## अंधाराच्या बुरुजावरही...

अंधाराच्या बुरुजावरही तेजाचा ध्वज लहरत राहिल !
पाषाणाच्या छाताडांतुन एक फूल वर डोकें काढील !
उपेक्षितांची, पराभुतांची थोडीशी वाढतांच हिंमत
चिमणीदेखिल दो पंखांतच गगनाला समावुन घेईल !

# काजवे

इथे
नेहमीच रात्र... अंधार...
नेहमीच वाहते
हिमशीत वारे
        माझ्यांत पेंगणाऱ्या सूर्यांना
                गोठवण्यासाठी.

फक्त—
चमकतात कधीमधी
घोंगावणाऱ्या
        काळ्याकभिन्न भेसूर वृक्षांच्या शेंड्यावर
        निसटत्या क्षणांचे
        काजवे !

## कधीच !

तुझ्या डोळ्यांनी
भूपाळी गाईली तरी
रात्र
माझ्या जखमांची
सरणार नाही
कधीच !

## नसणें

माझें नसणें
बसलें आहे
तुझ्या शहारल्या डहाळीवर
चिंवचिंवत ...
गुद्मरल्या आवेगाची
स्तब्ध छाया.

## पत्र

तूं लिहिलेल्या
चारच रेशमी ओळींच्या कोषांत
माझ्या स्वप्नाचें फुलपाखरू
काना मात्रा आणि वेलांट्यांत
पाय आखडून
पहुडलें आहे …
आपले न फुटलेले पंख
सहीजवळ मागत !

## ऐकलीस ?

खिडकीच्या गजांमधून
धडपडत येणाऱ्या
चांदण्याची धाप
ऐकलीस ?

# मागणें

माझी प्रसन्नता
मला न पाहवे,
जरा दुःख हवें !

नाहीतर मला
मीच विस्मरेन
आणि धुंडाळेन !

भक्तिभाव माझा
ठेवो अविचल
वेदना – विठ्ठल !

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत
अनुक्रम ३६०१४ वि: काव्य
क्रमांक १६२४ नों दि: ७५१०५८

## फुला

माझ्या गुलाबाच्या फुला
बोचला रे तुझा कांटा !
सोडवेना...रोखल्या रे
तुझ्या सुवासाने वाटा !

## ऊब

एकटाच मी—
अंधारासह
करीत गोष्टी सुखदुःखाच्या,
गतस्मृतींच्या
धगधगणाऱ्या शेकोटीवर
गारठलेलें माझें मानस
शेकत आहे !

## दिसलें....

दूर
नक्षत्रवनांत भटकतांना
दिसलें...
चेहरा नसलेलें
तुझें बोट धरून जाणारें
माझें गीत
मला.

# संध्याकाळ

थंड झोंबऱ्या वाऱ्यांत
अंग लपवीत ओलें
थरथरे संध्याकाळ !
...दूर विजेच्या ओठांत
उरामध्यें जपलेले
गीत गुंफितें आभाळ !

आळसावल्या निंबाने
घेत आळोखे पिळोखे
दिली प्रदीर्घ जांभई !
...तिथे शेकोटीभोवती
चंद्रावळीला भेटते
फारा दिवसांनी राई !

खांब दिव्यांचे रंगेल
कवटाळीती सडक
बरी एकटी पाहून !
कुण्या जुईच्या कळीला
कांही सांगावेसें वाटे
पण राहून राहून !

डावीकडील माडीच्या
बंद खिडक्यांमधून
निळा प्रकाश पाझरे
...सुप्त गीतांच्या मुर्शीत
कांही अस्पर्श लावण्यें
कांही अदृश्य चेहरे !

साऱ्या...साऱ्याच संज्ञांनी
अनुभवीत हें सारें
डोळे मिटून घेतले !
आज फिरून एकदा
माझ्या यातनागाथेचें
एक पान उलटलें !

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
११७६५
दा. क.

## स्मरण

पूर्तता माझ्या व्यथेची माझिया मृत्यूंत व्हावी,
जीवनापासून माझ्या ह्या मला मुक्ति मिळावी.

वेदनेला अंत नाही, अन् कुणाला खंत नाही;
गांजणाऱ्या वासनांचीं बंधनें सारीं तुटावीं.

संपली माझी प्रतीक्षा, गोठली माझी अपेक्षा;
कापलेले पंख माझे ......लोचनें आता मिटावीं.

सोबती कांही जिवाचे मात्र यावे न्यावयाला...
तारकांच्या मांडवाखाली चिता माझी जळावी.

दूर रानांतील माझी पाहुनी साधी समाधी...
आसवें साऱ्या फुलांचीं रोज खालीं ओघळावीं.

कोण मी आहे ? मला ठाऊक नाही नांव माझें !
शेवटी सारी धुळीने चौकशी माझी करावी.

हें रितें अस्तित्व माझें शोध शून्यांतील वेडा–
माझिया मागेच माझीं सर्व हीं ओझीं रहावीं !

काय सांगावें तुला मी ? काय मी बोलूं तुझ्याशीं ?
राख मी झाल्यावरी गीतें तुला माझीं स्मरावीं !

REFBK-0011765
REFBK-0011765



मराठी ग्रंथ संग्रहालय
अनुक्रम ३६०१४ वि: काव्य
क्रमांक १६२४ नों दि: १५/५/६४